: प्रकरण दुसरे :

# महात्मा फुले यांचे कुटुंबसंस्थेसंदर्भातील व पितृसत्ताकतेच्या संदर्भातील विचार

: प्रकरण दुसरे :

# महात्मा फुले यांचे कुटुंबसंस्थेसंदर्भातील व पितृसत्ताकतेच्या संदर्भातील विचार

पहिल्या प्रकरणामध्ये भारतीय संस्कृतीचा परामर्श पाहिलेलाच आहे. त्यात होत गेलेले बदल व 19 व्या शतकापर्यंत महात्मा फुल्यांच्या काळातील तत्कालीन संस्कृती व समाजव्यवस्था कशा पद्धतीची होती हे अभ्यासले आहेच. महात्मा फुल्यांनी आपले विचार स्पष्ट करताना समाजव्यवस्थेकडे विशेष लक्ष देऊन महत्त्वपूर्ण असे कुटुंबसंस्था व पितृसत्ताकतेचे विचार मांडलेले आहेत. त्यांचे हे विचार पाहण्यापूर्वी त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी बघणे गरजेचे ठरते.

**कुटुंबसंस्था :-**

स्त्री आणि पुरुष ह्या निसर्गाने निर्माण केलेल्या दोन मनुष्यजाती फार पूर्वी मनुष्य टोळी करुन राहत होता. अर्थात ही टोळी म्हणजे एक प्रकारचे सामुहिक कुटुंबच म्हणता येते. जेंव्हा शेतीचा शोध लागला तेव्हा संस्कृतीचा विकास होण्यासाठी स्थिर जीवनाची गरज होती. आणि यातनूच स्त्री पुरुष यांचे नाते माणसाला उमगले. आणि विवाहसंस्था, कुटुंबसंस्था अस्तित्वात आल्या. कुटुंबसंस्था ही संस्कृतीची पहिली पायरीच असे म्हणायला हरकत नाही. 'व्यक्तीच्या जीवनात कुटुंब ही संस्था अत्यंत मोलाचे कार्य करीत असते. कुटुंबसंस्था नक्की केव्हा अस्तित्वात आली हे कदाचित सांगता येणार नाही. परंतु ही संस्था अस्तित्वात येण्यापूर्वी स्त्री-पुरुष हे केवळ नर आणि मादी म्हणनूच इतर प्राण्यांप्रमाणे फक्त शारीरिक गरज भागविण्यासाठी एकत्र येत असावेत त्यांची जीवनपद्धती ही इतर प्राण्यांहून वेगळी नव्हती. परंतु माणसाला

केवळ शारीरिक नाही, तर भावनिक, मानसिक, आर्थिक अशा अनेक प्रकारच्या गरजा असतात. माणसाच्या ह्या विविध गरजांची काळजी कुटुंबसंस्थेने घेतली. [1]

विवाह, रक्तसंबंध किंवा दत्तक विधान आणि एकत्र निवास यांनी बांधल्या गेलेल्या दोन अगर अधिक स्त्री पुरुषांचा गट म्हणजे कुटुंब होय. समाजातील नात्यागोत्याच्या व्यवस्थेचा एक घटक म्हणून असलेले कुटुंबाचे हे स्वरुप आणि लक्षणे मानवी समाजात आजवर अस्तित्वात असलेल्या कुटुंबसंस्थेवरून निश्चित होत गेली आहेत. वेगवेगळ्या समाजातील तसेच एकाच समाजात वेगवेगळ्या काळी अस्तित्वात आलेल्या कुटुंबसंस्थेवरुन निश्चित होत गेली आहेत. वेगवेगळ्या समाजातील तसेच एकाच समाजात वेगवेगळ्या काळी अस्तित्वात आलेल्या कुटुंबसंस्थांचे स्वरुप, रचना व कार्ये याबाबत भिन्नता आढळून येते. एकूण संस्कृतीतील जीवनमूल्ये, धर्म व तदानुषंगिक आचार, नीतिनियम, अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था इ. संदर्भात समाजा-समाजात आणि एकाच समाजात कुटुंबसंस्थेची भिन्न भिन्न रूपे व प्रकार आढळणे अपरिहार्य आहे. ही भिन्नता कुटुंबाची रचना, स्वरुप, विस्ताराच्या दृष्टीने असलेला आकार, विवाह प्रकार आणि कुटुंबाची कार्ये या पाच घटकातून मुख्यत्वे दिसून येते.

## कुटुंबाचे स्वरूप व आकार :-

कुटुंबातील सदस्यांचे संबंध, मुलांच्या सामाजीकरणाच्या जबाबदाऱ्या वगैरे दृष्टींनी, कुटुंबाच्या स्वरूपाला व आकाराला महत्व आहे. कुटुंबाचे स्वरूप हे कुटुंबसदस्यांच्या कुटुंबप्रमुखाशी व एकमेकांशी असलेल्या रक्ताच्या नात्यावरुन ठरते, म्हणजे कुटुंबाचे सदस्य कोण असू शकतील, यावर ते अवलंबून आहे. कोणतेही कुटुंबाचे मूलभूत सदस्य पती, पत्नी , त्यांची अविवाहित मुले ही होत. पती पत्नी आणि फक्त मुलेच असलेल्या कुटुंबाला म्हणून केंद्र किंवा केंद्रस्य किंवा बीज कुटुंब म्हणतात. [2]

मानवी समाजाच्या अगदी आरंभीच्या काळात कुटुंब असे काही नव्हतेच, लहान मोठ्या

गटात ते पूर्णपणे विलीन झालेले असे, असे एक मत मार्क्सवादी व विकासवादी समाजशास्त्रज्ञ मांडत असत. पण बऱ्याच अंशी हे सर्व अंदाज आहेत. कुटुंबाचा उगम निश्चित केव्हा व कोणत्या अवस्थेत झाला, याचा तर्क करणे कठीण आहे. फारतर असे म्हणता येईल, की मानवी समाजाच्या कृषिपूर्व अवस्थेत गटजीवन हे कुटुंबाच्या तुलनेने अधिक प्रभावी होते. पण आई, बाप आणि मुले यांचे भावनिक दुवे याना त्या स्वरुपात सर्व समाजात दिसून येतात. या अर्थाने केंद्रकुटुंब हे सार्वकालिक आहे. स्वतंत्र घटक म्हणून त्याचे महत्त्व व स्थान अलिकडचे असले आणि गट किंवा संयुक्त कुटुंबाचे वर्चस्व काही समाजात जास्त असले, तरी पती, पत्नी व मुले यांचे रक्ताचे व सामाजिक दुवे यांचा पूर्ण लोप असलेली समाजरचना इतिहासात कुठे आढळत नाही.

केंद्र कुटुंबात इतर सदस्य समाविष्ट झाले, ते कुटुंब विस्तारीत होते. विस्तारीत कुटुंब हे मुख्यत: प्रचलीत असलेले विवाह प्रकार, विस्तार पावण्याची पद्धती आणि केंद्रकुटुंबाव्यतिरिक्त इतर सदस्यांचे कुटुंबप्रमुखाशी व एकमेकांशी असलेले नाते यांवरुन वेगवेगळे स्वरूप धारण करते. विवाहानंतर वधू किंवा वर स्वत:चे घर सोडून जोडीदाराच्या घरी जाऊन रहावयाच्या निवास नियमानुसार कुटुंबात विशिष्ट नात्याचेच लोक राहू शकतात. यामुळेही कुटुंबाचे स्वरूप बदलते.

एक विवाह, बहुपत्नी विवाह आणि बहुपती विवाह या तीन विवाहप्रकारांमुळे तीन वेगवेगळ्या स्वरूपांची कुटुंबे बनतात.[3] एकविवाह पद्धतीत एकावेळेला एका पतीस एकच पत्नी व पत्नीस एकच पती असू शकतो. एकविवाहपद्धतीने बनलेले कुटुंब हे केंद्रस्थ अगर विस्तारीत या दोन्ही स्वरूपातचे असू शकेल.

बहुपत्नी विवाहपद्धतीत एका पुरूषाला एकाच वेळी एकाहून जास्त बायका असू शकतात. सर्व आपापल्या मुलांबरोबर एकत्रच राहतात. काही जमातीमध्ये प्रत्येक स्त्री आपल्या मुलांसमवेत वेगळ्या

घरात राहते. परंतु सर्वांची घरे अगदी जवळजवळ असतात. व पती क्रमाने किंवा अन्य नियमांनुसार प्रत्येकीकडे जाऊन राहतो. अशा बहुपत्नीकुटुंबात अनेक केंद्रकुटुंबे समाविष्ट असतात, परंतु पती हा सामाईक असतो. म्हणून अशा कुटुंबाला केंद्रकुटुंब न म्हणता बहुविवाही कुटुंब म्हटले जाते. बहुविवाहाचा दुसरा प्रकार म्हणजे बहुपति विवाह. यात एका स्त्रीला एकाच वेळी एकाहून जास्त पती असतात. तिच्याशी विवाहबद्ध असलेले सर्व पुरूष भाऊ भाऊ असले, तर तिच्यासह एकाच घरात रहात असतात. अशा कुटुंबाला भ्रातृक बहुपतिकत्व कुटुंब म्हटले जाते. सर्व पुरूष जर वेगवेगळ्या कुटुंबातील असले, तर अशा विवाहाला अभ्रातृक बहुपतिकत्व म्हटले जाते. भारतातीलच केरळ मधील नायर जमातीमध्ये काही वर्षांपूर्वी एका स्त्रीशी वेगवेगळया कुटुंबातील पुरुषांनी शरीर संबंध ठेवण्याची 'संबंधम् ' विधीवर आधारलेली पद्धत होती. विवाहानंतर येणाऱ्या जोडीदाराची आर्थिक जबाबदारी अगर सहकार्याची आवश्यकताही या 'संबंधम् ' मध्ये अभिप्रेत नव्हती. [4] बहुपतीकत्वाच्या कुटुंबात स्त्री समाईक असून पुरुष अनेक असतात. भ्रातृक बहुपतिकत्व कुटुंबात अनेक केंद्रकुटुंबे असतात, परंतु स्त्री समाईक असते. बहुपत्नीकत्व आणि भ्रातृक बहुपतिकत्व या दोन कुटुंबातील महत्वाचा एक फरक असा, की बहुपत्नीकत्वाच्या कुटुंबात अनेक स्त्रीयांमध्ये एकच पुरूष समाईक असतो. आणि भ्रातृक बहुपतिकत्वाच्या कुटुंबात भावाभावामध्ये एकाहून अधिक स्त्रिया समाईक असू शकतात.

कुटुंब दोन प्रकारांनी विस्तारते. एक अनुवंशिक पिढीतून आणि दुसरे इतर केंद्रकुटुंबाचा समावेश करून. एकापेक्षा जास्त केंद्रकुटुंबे असलेल्या विस्तारित कुटुंबात एका पिढीतील केंद्रकुटुंबातील पती हा दुसरा पिढीच्या केंद्रकुटुंबातील पतीचा पिता किंवा पुत्र असतो. किंवा एका पिढीच्या केंद्रकुटुंबातील पत्नी ही दुसऱ्या पिढीच्या केंद्रकुटुंबातील पत्नीची माता अगर मुलगी असते. [5] यातील पहिला प्रकार हा विवाहानंतर होणाऱ्या वधूच्या निवासांतराशी, वारसाहक्क पित्यापासून पुत्राकडे जाणाऱ्या रूढीशी तसेच

पितृवंशीय व पितृसत्ताक संस्कृतीशी अधिक निगडीत आहे. हा प्रकार सर्व प्राचीन आणि आधुनिक संस्कृतीत प्रामुख्याने दिसून येतो. दुसरा प्रकार हा विवाहानंतर पतीने पत्नीच्या घरी जाऊन रहावयाच्या चालीशी व मातृवंशिय (आईकडून मुलीकडे वारसा हक्क येणाऱ्या ) व मातृसत्ताक संस्कृतीशी अधिक जुळणारा आहे. हा प्रकार भारतातील खासी व गारो जमातीत दिसून येतो. [6] एकूण पहिला प्रकार हा अधिक समाजात आहे. संयुक्त कुटुंबात भाऊभाऊ स्वेच्छेने एकत्र आलेले असतात, अशी कल्पना आहे. भारतात विस्तारीत कुटुंबातील सर्व विवाहीत भावांना जोडणारे आईवडील निर्वतले की उरते ते संयुक्त कुटुंब. भारतीय संदर्भात विस्तारीत कुटुंबाला ही संयुक्त कुटुंबच म्हटले जाते.

मातृगृहीय व पितृगृहीय पद्धतींबरोबरच मातुलगृहीय पद्धतही अल्प प्रमाणात रूढ आहे. यात लग्नानंतर वराच्या मामाच्या कुटुंबात किंवा जवळपास राहतात. [7] ही पद्धत मातृगृहीय आणि मातृवंशीय पद्धतींवरून उद् भवली असावी, असा तर्क आहे.

विवाहानंतर स्वतंत्र कुटुंबाची स्थापना करण्याच्या पद्धतीस नूतनगृहीय पद्धत म्हटले जाते. परिस्थितीप्रमणे वधूच्या अगर वराच्या मातापित्यांबरोबर राहण्याच्या पद्धतीस उभयस्थानिय पद्धत म्हणतात.

आकाराच्या दृष्टीने केंद्रकुटुंब हा सर्वात लहान गट असणे आणि क्रमाने बहुविवाही विस्तारीत कुटुंब मोठे असणे स्वाभाविक ठरते. वरील कुटुंबांव्यतिरीक्त दंपतिविहीन असे एखादे कुटुंब असल्यास ते कोणत्यातरी कुटुंबाचा खंडीत अवशेष असण्याचीच शक्यता असते.

## कुटुंबाची रचना व कार्य :-

कुटुंबाची रचना ही मुख्यत: कुटुंबाच्या सभासदांतील श्रमविभाजन तसेच सत्ता, अधिकार व दर्जा यांच्या स्वरूपावर व वाटपावर अवलंबून असते. मालमत्तेचा वारसा, घरातील सत्तेची व अधिकारांची

विभागणी, घटस्फोटाचे अधिकार व सवलती, मुलांवरील नियंत्रण या सर्व गोष्टींतून ती रचना व्यक्त होत असते. तथापि कौटुंबिक, रचनेची ही अंगे अखेरीस समाजातील सांस्कृतिक, धार्मिक मूल्ये, अर्थव्यवस्था व तिच्यामधील श्रमविभाजन पद्धति, सामाजिक स्तररचनेनुसार त्या त्या स्तरातील व्यक्तींना मिळणारी सत्ता, अधिकार व दर्जा आणि व्यक्तींची सामाजिक चलनशीलता यांच्याशी निगडीत असतात.

पितृसत्ताक कुटुंबात सापेक्षत: पित्याचे व पर्यायाने पुरुषांचे वर्चस्व असणे व मातृसत्ताक कुटुंबात सापेक्षत: मातेचे व पर्यायाने स्त्रियांचे वर्चस्व असणे स्वाभाविकच आहे. त्याचप्रमाणे मुलामुलींवर वडिलधाऱ्या माणसांचे वर्चस्व असणे हे ही तितकेच सुसंगत आहे. परंतु ही सर्व लक्षणे आदर्शात्मकच असतात. कारण लिंगभेद आणि वयोमानानुसार कामाची व सत्ताधिकारांची वाटणी होणे हे मुख्यत: समाजातील साध्या अर्थव्यवस्थेवर विशेषत: शारीरिक श्रमावरच आधारलेल्या श्रमविभाजनावर अवलंबून असते. या श्रमविभाजनाच्या स्थिरतेशी आणि कुंठीत सामाजिक चलनशीलतेशीही ते निगडीत असते.

आहारासाठी भटकणाऱ्या, शिकारीवर जगणाऱ्या किंवा बागायतीप्रधान जमातीत स्त्रियांना अधिक महत्व येते. यामुळे अशा जमातीत मातृवंशिय व मातृसत्ताक कुटुंबरचनेचे घटक उदयास येण्याचा संभव अधिक असतो. [8] अशा पद्धतीची मातृसत्ताक पद्धत सर्व प्रथम भारतात होती ज्यावेळेस पितृसत्ताकतेचा लवलेशही नव्हता.

## मातृसत्ताक कुटुंबपद्धती :-

कुटुंबातील व्यक्ती, मालमत्ता आणि व्यवहार यांच्यावर मातेची किंवा वडीलधाऱ्या स्त्रीची अधिसत्ता चालते, अशा व्यवस्थेस मातृसत्ताक कुटुंबपद्धती असे म्हटले जाते. मानवाच्या अप्रगत भटक्या अवस्थेमध्ये अपत्यप्राप्तीतील पित्याची भूमिका निश्चित माहीत नसल्याने अपत्ये 'मातेची' मानली जात असत तसेच पुरूष शिकारीसाठी निवासस्थानापासून दूर जात असे. त्यामुळे निवासस्थाने व तेथील थोडीफार

A
13599

मालमत्ता ही स्त्रीची मानली जात असे आणि त्यातूनच मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा उगम झाला असे मानवशास्त्रज्ञांचे मत आहे.[9]

या व्यवस्थेमध्ये कुटुंबाची वंशपरंपरा, कुलनाम व गोत्रनाम मातेकडून अपत्यांना प्राप्त होते. मालमत्ता स्त्रीची मानली जाते. आणि तिच्या मुली ह्या तिच्या वारसदार मानल्या जातात. धार्मिक कार्यामध्ये गृहप्रमुख या नात्याने स्त्रियांना प्राधान्य असते. विवाहनंतर वधू आपल्या मातेच्याच घरी रहाते. गरजेनुसार वर तिच्याकडे रहावयास जातो. काही जमातींमध्ये वधू-वर वराच्या मामाच्या घरी (म्हणजेच मातेच्या नातेवाईकांकडे) रहावयास जातात. काही ठिकाणी पुरुषाला स्वकष्टाने मालमत्ता जमवण्यास परवानगी असली, तरी ती पितृसत्ताक पद्धतीने त्याच्या अपत्यांना मिळत नाही तर ती त्याच्या भाच्यांकडे वारसाहक्काने जाते.[10]

ही पद्धत असणाऱ्या जमातीमध्ये विवाहप्रसंगी वधूमूल्य देण्याची प्रथा बहुधा आढळते. घटस्फोट सुलभ असतो. पती व पत्नी दोघेही घटस्फोट मागू शकतात. विधवा व घटस्फोटित स्त्रियांना पुनर्विवाहास मोकळीक असते. अनेक जमातीमध्ये अभ्रातृकबहुपतिकत्वाची चाल असते. बहुपत्नीकत्व क्वचितच असते व असले तरी भगिनीबहुपत्नीकत्व असते. अशा जमातींमधील दैवतांमध्ये स्त्रिली दैवते प्रमुख असतात आणि पुराणकथांमध्ये स्त्रियांच्या शौर्याच्या व मोठेपणाच्या कथा असतात.

पितृसत्ताक पद्धतीत स्त्रीचे स्थान जितके गौण असते, तेवढे मातृसत्ताक पद्धतीत पुरूषांचे स्थान गौण नसते. घरातील कामे स्त्रियांकडे व बाहेरील कामे पुरुषांकडे असे साधे श्रमविभाजन असते. आणि कुटुंबप्रमुख जरी स्त्री असली, तरी तिचा भाऊ किंवा क्वचित मुलगा कार्यकारी प्रमुखाची भूमिका बजावतो. गोत्रप्रमुखही स्त्रीच असते, पण प्रत्यक्ष जबाबदारी पार पाडणारा तिचा भाऊ असतो. अशा तऱ्हेने बहिणींचा प्रतिनिधि म्हणून दैनंदिन व नैमित्तिक व्यवहारात पुरूषाला अनेक अधिकार व स्वातंत्र्य असते,

फक्त त्याचे मत निर्णायक नसते. [11]

जेंव्हा अशा मातृसत्ताक जमाती स्थिर होऊन शेती, मासेमारी असे अतिरिक्त उत्पनाचे व्यवसाय स्वीकारतात किंवा त्यांच्यावर वारंवार आक्रमणे होऊन त्यांना युद्धे करावी लागतात किंवा दुसऱ्या एखाद्या पितृसत्ताक संस्कृतीशी त्यांचा संपर्क प्रस्थापित होतो, अशा वेळी तेथिल पारंपारिक मातृसत्ताक पद्धतीचा ऱ्हास होतो. कारण या सर्व प्रकारच्या बदलांमुळे पुरूषांचे महत्व वाढते आणि ते वर्चस्व गाजवू लागतात. कालांतराने तेथे पुरूषांना समान अथवा श्रेष्ठत्वाचे स्थान प्राप्त होते.

स्त्रीप्रधान वा मातृप्रधान असलेली समाजसंस्था वैदिक व अवैदिक भारतीयांमध्ये प्राचीन काळी होती. महाभारतातील नागवंशाशी वैदिक लोकांचे विवाहसंबंध घडत असत. नागांच्यामध्ये मातृप्रधानता होती. वासुकीच्या घरी त्याच्या भगिनीशी लग्न झाल्यावर जरत्कारु या ब्राह्मणास रहावे लागले. अर्जुनाचा विवाह उलुपी या नागकन्येशी होऊन तिच्यापासून इरावान नामकपुत्र झाला होता. तो आपल्या मातेपाशीच राहीला होता. वैदिक आर्यांच्या काही गटांमध्ये मातृप्राधान्य होते, याची काही सूचक लक्षणे सापडतात. परंतु पितृप्रधान अवस्था ऋग्वेदकाळातच पूर्णपणे निर्माण झाली असल्यामुळे मातृप्राधान्य काही प्राचीन अल्प गटात शिल्लक राहीले असावे, असा अजमास करण्यास थोडीशी जागा आहे. ऋग्वेदातील आदित्य ही संज्ञा मातृप्राधान्याची सूचक आहे. ऋग्वेदातील स्त्रीयांचा दर्जा स्मृतीतील स्त्रियांच्या दर्जापेक्षा मोठा आहे. प्राचीन आदिम समाजात पशुपालन पुरूषाकडे व कृषिकर्म स्त्रीकडे अशी कामाची विभागणी असे. म्हणून भूमी ही माता म्हणून पुण्य देवता झाली. मातृपूजेची संस्था हिंदुस्थानभर प्राचीनकाळापासून पसरली आहे. मोहेंजोदडो व हडप्पा येथील सिंधुसंस्कृतीत मातृपूजेची प्रतिके किंवा देवीच्या मूर्ती सापडल्या आहेत. ती संस्कृती वैदिकांची नसल्यास असे म्हणता येते की मातृपूजा अवैदिकांपासून वैदिकांनी वेदकालीच स्वीकारली होती. कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे प्राधान्य या पूजेत प्रतिबिंबित झाले आहे. [12]

आर्यांच्या आगमनापूर्वी भारतामध्ये राहणाऱ्या सिंधू संस्कृती व अन्य द्राविडी जमातींमध्ये मातृसत्ताक पद्धती होती असे मानणारा श्मिट, कोपार्स, मार्शल, मेंगीन इ. मानववंशशास्त्रज्ञांचा मोठा वर्ग आहे. वेदोत्तर वाङ्मयामध्ये मातृसत्तासूचक काही कथाभाग आढळतात. तथापि आर्यांच्या आगमनानंतर पितृसत्ताक पद्धतीच प्रभावी ठरली. विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत भारतात ईशान्येस खासी व गारो या जमाती आणि दक्षिणेस तोडा, कादर व नायर हे मातृसत्ताक व्यवस्था पाळणारे होते. परंतु अधुनिक समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्यात पितृसत्ताक पद्धतीचा हळूहळू शिरकाव होत आहे. ब्रिटीश कायद्याने नायरांमधील बहुपतिकत्वाची चाल बंद केली व त्यांच्या वारसाहक्क कायद्यातही बदल घडवून आणले (1896 ते 1942). त्यामुळे अप्रत्यक्षपणे त्यांच्या मातृसत्ताक पद्धतीला धक्का बसला.[13]

अशा प्रकारे कुटुंब संस्थेतील एक महत्वपूर्ण भूमिका पार पाडणारी मातृसत्ताक पद्धती हळूहळू लोप पावत गेली व त्या ठिकाणी पितृसत्ताक कुटुंब पद्धतीने आपले स्थान पक्के केले. पितृसत्ताक कुटुंब पद्धती सर्व ठिकाणी मान्य पावली.

**पितृसत्ताक कुटुंब पद्धती :-**

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीकडे वळण्यापूर्वी प्रजापतिसंस्था अभ्यासणे गरजेचे ठरले. कारण वेदकाळापासूनच खऱ्या अर्थाने पितृसत्ताक पद्धती अस्थित्वात आली. प्रजापती हा समाजाचे प्रारंभस्थान होय. प्रजापतिसंस्था वैदिक समाज संस्थेचे मूळ होय.[14] येथे प्रजापतिसंस्था कशाला म्हणतात हे बघणे जरूरीचे आहे. अनियंत्रित स्त्री-पुरूष समागमकाळी प्रजा, राज्य, पिता, पुत्र, माता, भगिनी इ. नाती अस्तित्वात नव्हती. अमुक अपत्य अमुक पुरुषाचे असे नक्की म्हणण्यास सोय नव्हती. फक्त अमुक मूल अमुक स्त्रीचे इतकेच म्हणता येई. त्यामुळे आईवरून मुलाला नाव मिळे. प्रजापतीच्या संततीची नावे जी व्यासांनी परंपरागत पुराणावरुन दिली आहेत ती सर्व आर्यांच्या नावावरुन पडलेली आहेत. प्रजापती संस्था

म्हणजे एकपतीत्वाची संस्था आर्य लोकांत जी सुरू झाली ती. येथून तेथून एकदम सुरू झाली नाही. काही टोळ्यांमध्ये सुरू झाली. बहुपतीत्वाची चाल मोठ्या प्रमाणात होती. पुराणप्रिय म्हणून आर्यांनी ती लवकर सोडली नाही. त्यामुळे अपत्यनामे ही मातृनामावरून ठेवण्याखेरीज गत्यंतर नव्हते. अतिप्राचीन आर्यकालीन मातृनामोत्पन्न अपत्यनामे ठेवण्याची चाल हजारो वर्षे या देशात प्रचलीत होती, व ती पूर्णपणे नष्ट होण्यास सध्याचा काळ लागला. ह्यावरून प्राचीन काळी मातृप्राधान्य जाऊन कुटुंबात पितृप्राधान्य येण्यास किती प्रयास पडले असतील व प्रजापतिसंस्था म्हणजे एक पतित्वाची संस्था प्रचलीत होण्यास किती अडचणी आल्या असतील याचा अंदाज येतो.

आर्य लोकात प्रजापतिकाली पितृप्राधान्याची जी एकदा स्थापना काही टोळ्यात झाली तिची उपयुक्तता समाजात उत्तरोत्तर वाढत गेली आणि कालांतराने आर्य लोकांत प्रथम शिष्टमान्य, नंतर बहुजन-मान्य, शेवटी धर्म मान्य होऊन बसली. अशा काळात म्हणजे पितृप्रधान्य पूर्णपणे स्थापन झाल्याच्या काळी शकपूर्व चौथ्या, पाचव्या शतकाच्या सुमारास महाभारत नामक इतिहासाचा कर्ता व्यास याला भारतीय इतिहास रचताना असा प्रश्न पडला की इतिहासाची सुरूवात कोठून करावी ? अतिप्राचीन सरमिसळ समागम काळापासून, मातृप्रधान कुटुंबसंस्थेच्या काळापासनू, की पितृप्रधान जी प्रजापतीसंस्था तिच्या काळापासून करावा ? प्रथमपक्षी म्हणजे सरमिसळ समागम काळापासून इतिहासाचा प्रारंभ करावा म्हटले तर कोण कोणाचा हे ओळखण्याची तत्कालीन समाजसंबंधाने अडचण पडू लागली. त्यामुळे अशी सुरूवात करणे अव्यवहार्य दिसले. द्वितीयपक्षी म्हणजे मातृप्रधान कुटुंबसंस्थेच्या काळापासून सुरूवात करता येत होती. मात्र मातृप्रधान कुटुंबपद्धतीमध्ये भाऊ, बहिण, आई व मामा हि चारच नाती स्पष्ट होत होती. तथापि बापाचा पत्ता अद्याप लागत नव्हता, त्यामुळे कोणाचा वंश, कोणत्या वंशाचा हे सांगण्याची अडचण पडू लागली. तेव्हा, हाही पक्ष इतिहासकाराने सोडून दिला. शिल्लक राहीला तिसरा पक्ष. पितृप्रधान

कुटुंबसंस्थेचा. ह्या संस्थेच्या काळापासूनच वंशपरंपरा ज्यास म्हणतात ते समाजात ठळकपणे दिसून येत होते. पणजा, आजा, बाप, मुलगा, नातू, पणतू अशी एकस एक लागून वंशपरंपरा ओळखता येत होती. त्यामुळे इतिहासकारांना ती सुरळीत भासली.[15] अशा पद्धतीने खऱ्या अर्थाने पितृसत्ताकपद्धती ओळखली जाऊ लागली.

कुटुंबातील घटक व्यक्तीवर पित्याची वा वडीलधाऱ्या पुरूषाची अधिसत्ता असणारी कुटुंबाची संघटना म्हणजे पितृसत्ताक कुटुंबपद्धती. अशा पद्धतीच्या कुटुंबातील सर्वच स्त्री-पुरूष व्यक्तींचे जीवन नियंत्रित करण्याचा अधिकार वयाने किंवा नात्याने मोठ्या असलेल्या पुरूषाकडे असतो. परंतु पितृसत्ताक पद्धतीत वयात आलेल्या इतर व्यक्तींचेही अधिकार वाढतात, हे लक्षात घ्यावे लागते. निरनिराळ्या काळी निरनिराळ्या देशात कुटुंबीय व्यक्तीवरील मुख्य पुरूषाच्या अधिकाराच्या मर्यादा वेगवेगळ्या दिसतात. मालमत्तेचा वारसा आणि सामाजिक स्थान पित्याच्या वांशिक परंपरेने चालत आलेले असे आणि पुढे देखिल पुरूषसंततीकडेच संक्रमित होत असे. कुटुंबातील व्यक्तींच्या वर्तनास मर्यादा घालून देणे, कुटुंबातील मुलामुलींचे विवाह ठरविणे, संपूर्ण संपत्तीवर आपली मालकी ठेवून इतरांची गरजेनुसार साये करणे, इतकेच काय पण कुटुंबातील व्यक्तींना विकून टाकण्याचा देखिल अधिकार त्याला असे. अनेक प्राचीन मानवी समुहात अमर्याद पितृसत्ता असलेली कुटुंबपद्धती होती, असे दिसते. आधुनिक काळातदेखिल सुधारलेल्या मानवी समाजात पितृसत्ताक पद्धती असली तरी पित्याच्या अधिकाराला आता खूपच मर्यादा पडलेल्या आहेत.

व्याध संस्कृतीच्या अवस्थेत असलेल्या मानवी समूहात मातृसत्ताक पद्धती होती.[16] पुरूषाने शिकारीला जाणे. शिकार मिळवून आणणे व स्त्रीने घर सांभाळणे असे श्रमविभाजन होते. शेतीचा शोध स्त्रीनेच लावला, असे आता मानले जाते. शेतीचा शोध लागल्यानंतर भटकणारा मानव स्थिर स्वरुपाचे

जीवन जगू लागला. निरनिराळे व्यवसाय निर्माण झाले. समाजात उत्पादन अधिक होऊ लागले. घरेलु व्यवसायात स्त्रीचाच सहभाग मोठा होता. तरीपण काही कार्य अशी होती, की स्त्रीला त्यातून वगळणे भागच होते. उदा. युद्धात शत्रूशी सामना करण्याचे, उत्तरदायित्व पुरूषांकडेच होते. यात जर स्त्री सहभागी झाली तर वंशच नष्ट होण्याची भिती होती. युद्ध ही एक अशी महत्वाची घटना होती, की ज्यामुळे समाजात पुरूषाचे वर्चस्व निर्माण झाले. वंशवृद्धीसाठी स्त्रीला जपणे आवश्यकच होते. त्यामुळे स्त्रीचे कार्यक्षेत्रच मर्यादित राहिले शिवाय तिच्यावर बंधनेही आली. रक्षणकर्ता म्हणून पुरूषाची भूमिका असल्याने स्त्री ही 'रक्षित' बनली. कृषिजीवनाचा विकास व निरनिराळ्या व्यवसायांचा उदय यांमुळे कुटुंबातील सदस्यांची संख्या अधिक असणे आवश्यक बनले. [17] बहुपत्नीविवाहाचे हे एक कारण सांगण्यात येते. पुरुषाच्या अनेक बायका, त्यांची मुले या सर्वांचे मिळून विस्तारीत कुटुंब निर्माण झाले. व कुटुंबप्रमुखाची सत्ता वाढत गेली.

औद्योगिक क्रांतिनंतर पारंपारिक व्यावसायांचा ऱ्हास होत गेला, तसे कुटुंबसंस्थेवर त्याचे परिणाम होऊन कुटुंबे विभक्त झाली. पती-पत्नि आणि त्यांची अविवाहित मुले-मुली यांनी बनलेल्या नव्या कुटुंबात अधिसत्ता हि पुरूषांकडेच असते. मालमत्तेचा वारसा, घराण्याचे नाव पुरूष वंशाकडूनच संक्रमित होते.

पितृसत्ताक कुटुंब पद्धतीने एकंदरच मानवी समाजव्यवस्थेवर प्रभाव टाकलेला आहे. मानव जातीने इतिहास काळात स्विकारलेले आदर्श, मूल्ये, प्रमाणके ही पुरूषांना अनुकूल असलेली अशीच राहीली. स्त्रीला कुटुंबात दुय्यम स्थान प्राप्त झाल्यामुळे तिचा सामाजिक दर्जा एकंदरच पुरूषाच्या तुलनेत कमी राहिला. पुढे पुढे मध्ययुगात तिच्यावर अनेक बंधने लादली गेली. अर्थव्यवस्था, राजकारण, धार्मिक जीवन या सर्वांवरच पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा प्रभाव पडलेला दिसतो.

## महाराष्ट्रातील कुटुंबपद्धती :-

महाराष्ट्रातील कुटुंबपद्धती ही पितृप्रधान होती व आहे. पितृप्रधान कुटुंबात पति-पत्नी तसेच आई-वडिल, भाऊ-बहिण आणि मुलांच्या बायका व संतती ही कुटुंबीय ठरतात. मुलींची संतती त्या ज्या घरी दिल्या असतील, त्या घरची मानली जाते. दत्तकविधानाने एखादी व्यक्ती कुटुंबसदस्य ठरू शकतो. कुटुंबाचे 'केंद्र कुटुंब', 'संयुक्त कुटुंब' असे दोन प्रकार पडतात. परिस्थितीनुरूप कुटुंबाच्या रचनेत स्थित्यंतरे घडतात. केंद्र कुटुंबात पति-पत्नी व त्यांची अविवाहित मुले असतात. संयुक्त कुटुंबात वर कुटुंबीय म्हणून निर्देश केलेले सदस्य असतात. संयुक्त कुटुंबाचा विस्तार उभा किंवा आडवा असू शकतो. पितृप्रधान कुटुंबात उभा विस्तार पित्याकडून मुलाकडे व आडवा विस्तार विवाहीत भावाभावांना सामावणारा असतो. [18] पितृगृहनिवासी कुटुंबात स्त्री आपल्या मुलांसमवेत पतीच्या घरी राहते. पितृप्रधानकुटुंबात पिता हा कुटुंबप्रमुख असतो. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील कुटुंबाचे स्वरूप पितृप्रधान व संयुक्त स्वरूपाचे आजही आहे. नागरि जीवनातही हेच स्वरूप बऱ्याच प्रमाणात टिकून आहे. विवाह, अत्यंसस्कार, संपत्तीवाटप यासारख्या बाबींवर पुरूषांचे हक्क, पुत्राचे महत्व, पतिव्रत्याची संकल्पना, वडिलकीचा मान इ. पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेतील संकल्पनांचा अविष्कार प्रभावीपणे दिसून येते.

अशाप्रकारची महाराष्ट्रातील कुटुंबपद्धती आहे. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे कुटुंबप्रमुखाची हुकुमशाही आणि स्त्रियांची गुलामगिरी हाच समाजातील मूळ विषमतेचा आधार बनला. केवळ कुटुंबाकडूनच नव्हे तर समाजाकडून पुरूषांकडून गुलामगिरी लादली गेली.स्त्रियांच्या दर्जाच्या घसरणीचा काळ हा खऱ्या अर्थाने मनुस्मृतीमुळे सुरू झाला. प्रा. अंकुश सावंत यांनी 'मनुस्मृती, एक समालोचन' या पुस्तकात मनूच्या कुटुंबव्यवस्थे विषयी लिहले आहे. ते आपल्या पुस्तकात असे म्हणतात, मनुस्मृती पूर्णपणे चार वर्णावर अवलंबून आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र. कुटुंबव्यवस्थेत

विवाहसंस्थेस अनन्य साधारण महत्व आहे. मनु आठ प्रकारच्या विवाहांचे उल्लेख करतो. यापैकी ब्राह्म, दैव आर्ण, प्राजापत्य, आसुर, गांधर्व हे पहिले सहा विवाह ब्राह्मणास, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पैशाच हे क्षत्रियास, राक्षस सोडून शेवटचे तीन आसुर गांधर्व आणि पैशाच हे वैश्य व क्षुद्र यांसाठी अशी त्याची विभागणी वर्णावर आधारीत केली आहे. कुटुंबव्यवस्थेतील वर्णनात पितृप्रधानताच दिसून येते. मुलगी, तरूण स्त्री वा म्हातारी स्वइच्छेने काहीही न करता बाल्यावस्थेत पित्याच्या, तरूणपणी पतीच्या आणि वृद्धकाळी पुत्राच्या छत्राखाली रहावे. मुलीला उपनयन संस्काराची गरज नाही. स्त्रीने घरकामाकडेच लक्ष द्यावे, घरातील सर्व कामे करावीत. काटकसरीने संसार करून नेहमी प्रसन्नचित्त असावे. विवाह पवित्रसंस्कार असल्याने विवाहगाठ मृत्युशिवाय सुटत नाही. संतती हा कुटुंबाचा महत्वाचा घटक आहे. पुत्रजनन विवाहाचा मुख्य हेतू आहे. पहिल्या मुलामुळे मनुष्य पितरांच्या ऋणातून मुक्त होतो. मनूचे स्त्री संदर्भातील कायदे हे फक्त लैंगिक नीतीमत्ता, पत्नीधर्माची कर्तव्य आणि वैवाहिक एकनिष्ठता याभोवतीच घुटमळताना दिसतात.

वैधव्यकाळात स्त्रीने फळ, फुल, कंदमुळ यावर गुजराण करून स्वत:चा देह कृश करावा. शेवटच्या श्वासापर्यंत तिने पतिव्रतधर्माचे पालन करीत रहावे. नाहीतर मृत्यूनंतर तिला स्वर्गात पतीबरोबर जागा मिळत नाही. अशा रितीने मनू विधवेला पुनर्विवाहापासून वंचित करतो. प्रथम पत्नी मृत्यु पावल्यानंतरच नव्हे तर, ती जीवंत असतानाही पुरुषाला दुसरा विवाह करण्याची मुभा मनू देतो. कुठल्याही परिस्थितीत पत्नीने घटस्फोट घेण्याची व्यवस्था मनूच्या कायद्यात उपलब्ध नाही.[19]

मनुस्मृतीमध्ये बहुविवाह किंवा सतीचा उल्लेख नाही. त्यामुळे ही प्रथा नंतरच्या काळात रूढ झाली असावी. पूर्ण भारतीय समाजजीवनावर आजतागायत मनुस्मृतीचा पगडा दिसून येतो. आताच्या काळात कमी प्रमाणात असला तरी 19 व्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणात होता. आणि पूर्णपणे ते

पितृप्रधानपूरकच होते.

## महात्मा फुले यांचे कुटुंबसंस्थेसंदर्भातील व पितृसत्ताकतेच्या संदर्भातील विचार :-

### ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

भरतीय संस्कृतीतील पितृसत्ताक पद्धती आपण पाहिलीच आहे. सामाजिक समतेच्या सर्व सुधारणांमध्ये स्त्री-पुरूष समता, फार काय स्त्रियांचे किमान सामाजिक हक्क प्रस्थापित करणे ही सर्वात कठिण गोष्ट आहे. अगदी मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेमधील -आदिम साम्यवादी समाजातील स्त्री पुरूष समानता सोडल्यास, पुढे खाजगी मालमत्तेच्या उदया बरोबरच पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्था अमलात आणली. [20] स्त्रीच्या अधिकारांना मर्यादा आल्या. संरक्षणासाठी पिता, पती अगर पुत्रावर अवलंबून रहावे लागले. स्त्रीची गुलामगिरी सुरूच होती. समाजातील जाती व्यवस्थेमुळे तर अधिकच दृढ बनली. शूद्र व स्त्री यांना समान मानले जाई. या दोन घटकांना मिळणारी वागणूक समाजकडून सारखीच असे. मातृसत्ताकतेनंतर पुरूषप्रधान व्यवस्थेत सर्वस्वी पुरूषांवरच अवलंबून रहावे लागले. अशी स्त्रियांची स्थिती होती.

### महात्मा फुल्यांचे कुटुंबसंस्थेसंदर्भातील विचार :-

पूर्वेइतिहास बघता आपणास असे आढळते की स्त्री व शूद्र यांना विद्याप्राप्तीचा अधिकार नव्हता. समाजात असा समज होता, स्त्रीही विश्वासास पात्र नसते, शिक्षणामुळे ती उद्दाम होऊन वाईट मार्गास लागते. स्त्रीने शिक्षण घेणे पाप आहे. ती शिक्षण घेतल्यामुळे घरातील शांती समाधान नष्ट होते. मोठ्या माणसांसमोर पतीशी बोलणे असभ्य चालीची मानले जाई. ती अबला आहे. सतत कुणाचातरी आधार हवा असतो. स्त्रीच्या बुद्धीने वागत गेल्या सर्वस्वी नाश होतो. अशा विचारांचा तो काळ होता.

अशा प्रकारची विचारसरणी कुटुंबव्यवस्थेत रूजली होती. कुटुंबातील महत्वाचा असलेल्या स्त्री घटकाला दुय्यम स्थान व हीन दर्जा दिला होता. ही सर्व स्थिती त्या काळात फुल्यांच्या निदर्शनास आली. समाजातील सर्व घटकांना सारखे व समान जीवन जगता यावे हा त्यांचा उद्देश होता. त्यामुळे पुरूषप्रधान संस्कृती व जातीभेदावर त्यांनी कडाडून हल्ले केलेले दिसून येते. अस्पृश्यतेचा प्रश्न त्यांच्या मनात भेदून गेला होता. त्याकाळात स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार करणारे महात्मा फुले हे पहिलेच होत. त्या काळातील लोकहितवादी, भांडारकर, रानडे, आगरकर इ. नी स्त्री प्रश्नाचा विचार केला होता. स्त्रीयांचे शिक्षण, प्रौढविवाह, स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन, विधवेचा पुनर्विवाह या मुद्यांना त्यांनी हात घातलाच होता. पण फुल्यांनी मात्र तो स्वतंत्र प्रश्न न मानता सामाजिक दृष्टीकोनातून हाताळला. संस्कृतीतच असलेली स्त्री विषमता म्हणूनच स्त्रीविषयीचा विचार केलेला होता. पूर्ण समाजाची रचना बदलल्या शिवाय स्त्रियांची परिस्थिती सुधारणार नाही हे त्यांनी जाणले. स्त्री पुरूष समतेसाठी सामाजिक पर्यावरण बदलण्याइतकाच भर त्यांनी कुटुंबसंस्थेची अधिसत्तावादी संरचना मोडण्यावरही दिला होता. स्त्री-पुरूषांसाठी वेगवेगळे बंधन घालणाऱ्या मनूच्या 'नैतिक ' कायद्यांना नकार दिला होता.[21] सार्वजनिक जीवनात भाग घेण्याची मुभा स्त्रियांना न देता त्यांचे इतर हक्कही अतिमर्यादीत केले होते. किंबहुना, कुटुंब, गोत्र, वंश वगैरे सगळ्याच संस्था स्त्रियांचे दास्य इथे दृढावण्यास साधनीभूत ठरला.

बालविवाहातून अनेक निर्माण होणाऱ्या अरिष्टांमुळे जोतिबांचा त्यास विरोध होता. लहानपणी न विचारता केलेली पत्नी न आवडल्यामुळे दुसरी आणण्याचे निमित्त मिळून बहुपत्नीत्वाची अनिष्ट प्रथा फैलावते. जरठ आर्यभटाला बालिकेशी पुनर्विवाह करून तिचे आयुष्याची माती करण्याची मोकळीक इथली परंपरा देते. मात्र तिनेच ''बालपणी वैधव्य आलेल्या अज्ञानी मुलीने मात्र पुन: द्वितीय संबंध करू नये म्हणून कडेकोट प्रतिबंध करून प्रचारात आणिला आहे.'' याचा परिणाम असा झाला की

तरूण विधवांच्या आगतिकतेचा फायदा घेऊन आडमार्गी पाऊल टाकण्यास आयतेच फावले, आणि अब्रु वाचवण्यासाठी भ्रूणहत्या करणे त्या स्त्रियांना नाईलाजाचे बनले. [22] यामुळेच जोतीराव म्हणतात ''स्त्रीपुनर्विवाह करण्याची बंदी।। अन्यायाची धुंदी ।। थांग नाही।।[23] याबाबतीत आर्यभटांचे अनुकरण करणाऱ्या कुळवाडी, सोनार वगैरे जातीतील पुरुषांनाही जोतीरावांनी धारेवर धेतले आहे. स्वत: अनेक स्त्रियांचा पति होण्यामध्ये धन्यता मानणारा पुरुष ''स्त्रीस का उलटी रीती'' लागू करतो ? बहुपतिक त्यांना का होऊ देत नाही असा सवालही त्यांनी विचारला आहे. [24] अशा प्रकारचे विचार त्यांनी ओवी स्वरूपात 'अखंडादि काव्यरचनेत' प्रकट केलेले आहेत.

रोटीबेटी संबंध हा जातीयतेवर आहे. यामुळे जातीतील स्त्री-पुरूष विषमता बळकट केलेली आहे. कुटुंबव्यवस्थेत स्वजात्यंगर्तच विवाह व्हावेत असा कटाक्ष असला तरी समाजात मात्र अनुलोम विवाहाला मुभा असते, कारण त्यातून समुहांच्या उतरंडीला बाधा येत नाही. शिवाय पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे गौणत्वही त्यातून प्रस्थापित होते. [25] म्हणूनच 'सत्सार-1' मध्ये जोतीरावांनी लीहिलेल्या संवादात ब्रह्मसमाजीयन असलेल्या एका ब्राह्मणाला एक शूद्र विचारतो, ''व्यास व वसिष्ठ यांच्या माता शूद्रादि अतिशूद्र कुळांतीलन होत्या --- तथापि यांचे पिताजी शूद्रादि अतिशूद्र नव्हते, परंतु त्यांचे जन्मदाते आर्यब्राह्मण होते. म्हणूनच पूर्वजांनी व्यास, वसिष्ठ यांना ब्राह्मणात सरते करून घेण्याचे कारण म्हणजे ते आर्यब्राह्मणांचे बीज होते परंतु शूद्रादि अतिशूद्रापासून कार्य ब्राह्मणीस झालेल्या उत्पत्तीस तुम्ही आर्यब्राह्मणांनी आपल्यात सरते करून घेतल्याविषयी तुमच्या ग्रंथात काही मुद्दे सापडतील काय ?''[26] अशा प्रकारचे जातीभेद, कुटुंबव्यवस्थेचे विचार त्यांनी स्पष्ट केले आहेत. कुटुंबसंस्थेशी निगडीत असणाऱ्या 'लग्न' या विषीची व्याख्या अशी करतात ''परस्परांचे साथी व साह्यकारी होऊन एक चित्ताने वर्तन करून त्यांनी सुखी व्हावे, म्हणून जी काही परस्परांशी कबुलायत करण्याची अट घातली आहे त्यास लग्न असे

म्हणतात.[27]

प्रथम स्त्रियांना शिकविण्याचा विचार जेंव्हा त्यांनी केला तेंव्हा त्यांच्यामते असे करणे म्हणजे जातीव्यवस्था विरोधी लढयाचा एक भाग होता, पण पुढे पं. रमाबाईची स्तुती करताना स्त्रियांनी शिक्षण घेतल्यावर होणाऱ्या परिणामाना 'भटभिक्षुक' का घाबरतात याचे जे स्पष्टीकरण दिले त्यातून पुरूषी दादागिरी नष्ट होण्याची भिती हे महत्वाचे कारण दिले आहे. शिकलेल्या ब्राह्मण स्त्रिया 'आर्य' ग्रंथकारांनी स्त्रियांविषयी लिहीलेल्या 'जुलमी' लेखांबाबत त्यांना जाब विचारतील असे त्यांनी म्हटले आहे.[28]

जोतीबांना असे आढळून आले की पुरूषी दादागिरी फक्त ब्राह्मण कुटुंबात नाही तर ती सर्व बहुजन समाजातील स्त्रीयांवरही होते. तिला मारझोडही केले जाई. यावरूनच त्यांच्या लक्षात आले असेल की स्त्री दास्यत्वाची व्यवस्था जर सर्वच समाजात असेल तर ताराबाई शिंदे सारखी स्त्री बंडखोर का असणार नाही ? या गोष्टीने स्त्रियांना शिक्षण देण्याचा त्यांचा उत्साह वाढला. त्यांनी यापुढे जाऊन कुटुंबसंस्थेत सुधारणा घडवून आणण्याच्या कामात आगत्याने भर दिला.

भारतीय कुटुंब व्यवस्था अनेक पद्धतीवर आधारलेली असली तरी जास्तकरून पितृप्रधान पद्धतीची आहे. जातीव्यवस्थेवरही आधारीत आहेच. हे टिकविण्यासाठी 'रोटी-बेटी व्यवहार' जातीअंतर्गतच ठेवलेले आजही आपणास आढळते. याचा अर्थ बाहेर जाऊन इतर धर्माच्या मुलांमध्ये मिसळण्यास बंदी असाच होतो. अशा पद्धतीवर कुटुंब सस्था आधारीत होती. आजही आईवडिलांनी ठरविलेल्या मुलाशी अगर मुलीशी लग्न करण्याची रूढी समाजात असलेली दिसून येते. मुला-मुलींना आपले जीवनसाथी निवडणार, समाजात एक नवे कुटुंब म्हणून पुढे येणार, त्यांच्या या स्वातत्र्याएवेजी 'जात व खानदान' याला महत्व देऊन समाज रिकामा होतो. फुल्यांच्या काळात तर बालविवाह पद्धत रूज होती. लहान वयात लग्न झालेल्या मुलीला काहीही समजत नसताना 'नांदायला' जावे लागे. तिच्या मनावर

लहानपणापासूनच सासू, दीर, नणंद, नवरा, सासरा इ. ची सासरच्या लोकांची सेवा करण्याचे बिंबवले जाते. नवऱ्याची अरेरावी सहन करावी लागते. नवऱ्याने दुसरे लग्न केल्यास कोणतीही तक्रार करायची नाही. अन्यथा माहेरी पाठविली जाण्याची शक्यता असे. आजही अशी उदाहरणे समाजात दिसून येतात. मनुस्मृतीमध्ये तर स्पष्टच तिच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालून आयुष्य जगण्याची विभागणीच केलेली दिसून येते.

स्त्री दास्यत्वाची सुरूवात कशी झाली या विषयी त्या काळात उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे एंगल्सने आपले विश्लेषण मांडले आहे. फुल्यांच्या काळातच युरोपियन वातावरणात वाढलेल्या एंगल्सने ही मांडणी केली. त्याचे मते, खाजगी मालमत्ता प्रस्थापित झाल्यावर त्या मालमत्तेच्या उत्तराधिकारी आपलाच वारस आहे याची हमी तयार करण्याकरता पुरूषांनी मातृवंशीय पद्धती आणि स्त्रियांच्या अधिकारांचा उच्छेद केला. स्त्रियांना असे 'गुलाम' करून त्यांचा 'जागतिक-ऐतिहासिक' पराभव केला. [29]

फुल्यांचे विश्लेषण वेगळ्या स्वरूपाचे होते. समाजाच्या बदलणाऱ्या गोष्टीमागचा इतिहास यावर त्यांचा विशेष भर होता. शेतकऱ्यांच्या जमिनी लुटण्यामागील कारणे, पुरूषांनी केलेल्या स्वाऱ्या, हिंसाचार याकडे लक्ष देण्याचा त्यांचा कल होता. कारण समाजातील निर्माण झालेली विषमता या गोष्टींमुळेच होती. यातूनच देव, धर्म, धर्मग्रंथ यांची निर्मिती होऊन भटशाही वाढली. खालच्या जातींवर दादागिरी सुरू झाली. समाजातील सर्वश्रेष्ठ ब्राह्मणवर्ग बनला. शूद्र अतिशूद्रांसाठी कष्टकरी जीवनाची विचारसरणी मांडली. स्त्रियांची मुक्ती आणि जाती व्यवस्थेचा बिमोड करण्याचे ठरविले. त्यादृष्टीने कुटुंब पद्धतीची पुनर्रचना हा विचार व कार्यक्रम त्यांचे महत्वाचे अंग बनून पुढे आला. त्यांच्या ऐतिहासिक विचारसरणीच्या वैशिष्ट्यांमुळेच धर्म, संस्कृती, रूढी, विषम व्यवस्था, भेद हे नष्ट करणे व नव्याने

कुटुंबाची पुनर्रचना करणे यावर ते भर देऊ शकले.

19 व्या शतकामध्ये स्त्री विषयक कार्यामध्ये बालविवाहावर बंदी, सतीप्रथेवर बंदी, स्त्री-शिक्षण, विधवांचे पुनर्विवाह इ. महत्वपूर्ण उपक्रम होते पण हे सर्व कुटुंब पद्धतीच्या पुनर्रचनेचा एक भाग होता. हिंदू-ब्राह्मण समाज श्रेष्ठ आहे, फक्त त्यातील काही वाईट बाजू नष्ट केल्या पाहिजे अशी तेव्हांच्या समाजसुधारकांची धारणा होती. या सुधारकांनी जातीव्यवस्था व पुरूषी वर्चस्व याच्याशी वरील गोष्टींचे संबंध जोडलेले नव्हते. अशा समजुतीमुळेच सनातनी ब्राह्मणी समाजाकडून होणाऱ्या विरोधामुळे सुधारणावादास अडथळा झाला. हे सर्व लोक ताराबाई शिंदे, पं. रमाबाई यांच्या तथाकथित 'अतिरेकी' स्त्रीवादी भूमिकांवर सनातन्यांनी हल्ला केल्यावर म्हणूनच मूग गिळून गप्प बसले. अशा पार्श्वभूमीवर या समाजसुधारकांकडून पितृसत्ताकतेवर हल्ला केला जाणे सर्वार्थाने शक्य नव्हते. [30]

ब्राह्मणीसमाजात किंवा उच्चवर्गातच नाहीतर समाजातील सर्व स्तरीय वर्गात पुरुषांकडून स्त्रियांची दडपणूक होत होती. शूद्र, अतिशूद्र समाज ही याला अपवाद नव्हता. फरक इतकाच की शूद्र अतिशूद्र समाजही याला अपवाद नव्हता. फरक इतकाच की शूद्र अतिशूद्र यांच्या बायका शेतात कामे करीत व ब्राह्मणी स्त्रीयांच्या मानाने थोडया स्वतंत्र होत्या. फुले ही बहुजन समाजातूनच पुढे आले होते. जातीव्यवस्थेचा जाच त्यांनाही भोगावा लागला होता. बहुजन समाजात स्त्रियांचा शेती व उत्पादनात सहभाग होताच. अलिकडील काळापर्यंत बहुजन समाजात हुंडा पद्धत नव्हती. उलट मुलीच्या आईवडीलांनाच दहेज देण्याची पद्धत होती. यांच्या विवाहपद्धतीसुद्धा वेगळ्या होत्या.

जोतीबांनी कुटुंबाची पुनर्रचना ही सामाजिक धार्मिक रितीरिवांजासहीत करण्याचे ठरविले. लग्न लावण्यासाठी ब्राह्मण हा आवश्यक होता. बहुजन शूद्र, अतिशूद्रांच्या विवाहपद्धतीत वैदिक रूढी नव्हत्या. त्यामुळे फुलेंनी पर्यायी विवाह पद्धत शोधण्यास सुरूवात केली. सर्व घटकांना उपयुक्त व कुणीही

लग्न 'विधी' करेल अशी सोपी पद्धत शोधून काढली. त्यांच्या विचारामध्ये स्त्री समानता व स्वातंत्र्यावर दिलेला भर सहज दिसून येतो. त्यांनी सत्यशोधक समाजासाठी 1887 मध्ये ही विवाहपद्धती मांडली. त्यांनी लिहीलेली मंगलाष्टके पितृसत्ताक विरोधी असणारेच आढळतात. काही मंगलाष्टकाचे कडवे पुढीलप्रमाणे,

वधू : ''आम्हा सर्व स्त्रिया असे बहुपिडा हे नेणेशी तूं कसे ।।

स्वातंत्र्यानुभवाची ओळख आम्हा, झाली नसे मानसी।।

यासाठी अधिकार देशिल स्त्रियां, घे आण त्याची अशी।।

वर आश्वासन रूपात (म्हणतो)

''स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा।।

खर्चाया न मनी मी भी किमपिही, सर्वस्व माझे कदा।।

मानितो सकला स्त्रियांस बहिणी, तू एकली मत्प्रिया ।।

कर्त्याचे भय मी मनात तुजला, ठेवीन पोसावया।।

नंतर वधू लोकहितासाठी, समाजसेवेचे कार्य करणेविषयी म्हणते,

''आज्ञाभंग तुझ्या करीन न कदां, मी सत्य कर्त्यावर।।

ठेवोनी अवघाची भार झटुया, लोकां कराया हिता ।।

हाताला धरुनी तुला वरितसे, सर्वांपुढे मी आता।।

शुभमंगल सावधान।।4।।[31]

यावरून हे दिसते की स्त्री आपल्या स्वातंत्र्य व अधिकार याची मागणी करते.

वरही तिला तसे आश्वासन देतो. वधू त्याला तसे वचन देण्यास सांगते. एवढेच नाहीतर वधू त्याला आपली समाजातील भूमिका पार पाडण्यासाठी कर्तव्य बजावण्यास ही सांगते. अशा प्रकारे जोतीबांनी नवीन 'सत्यशोधक विवाह' पद्धती सुरू करून 'कुटुंब पद्धतीची पुनर्रचना' करण्यात सुरूवात केली. नंतर भारतात अनेक चळवळी झाल्या. जुने हिंदू कायदे रद्द करण्याचा व स्त्रियांना वारसाहक्क देण्याचा प्रश्न मूळ धरू लागला. वेगवेगळ्या विवाहपद्धती निर्माण होऊ लागल्या. तामिळनाडूत रामस्वामी पेरियार यांच्या नेतृत्वाने जातीव्यवस्थेविरोधी स्वाभिमानी चळवळीतून 'स्वाभिमानी विवाह', स्वातंत्र्यचळवळीत 'गांधी विवाह', जयप्रकाश आंदोलन काळात 'जयमाला' विवाह पद्धत, कम्युनिस्ट चळवळीच्या काही भागात वेगळी पद्धती तर बौद्ध धर्म, स्विकारल्यानंतर महाराष्ट्रातील दलितांमध्ये 'बौद्ध विवाह' पद्धत सुरू झाली. [32] अशा प्रकारच्या नवीन विवाह पद्धती समाजात रूढ झालेल्या दिसतात. स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करताना त्यावेळेस समाजातील जुनी मूल्ये फेकून नवीन मूल्ये स्विकारणे गरजेचे बनते. आणि म्हणूनच फुल्यांची सत्यशोधक विवाह पद्धती ही सर्वात पहिली समाज सुधारण्याचा प्रयत्न करणारी ठरते. या विवाह पद्धतीतून स्त्री प्रश्नांची जाणीव व गुलामगिरी याचे चित्र स्पष्ट होते.

फुल्यांनी आपले विचार प्रकट करताना अतिशय महत्वाच्या बाबींचा त्यात आंतर्भाव केलेला आहे. त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकामध्ये कुटुंबसंस्थेतील स्त्री पुरूष विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केलेल आहे. माणूस या अर्थाने स्त्री पुरूष यांना समानलेखलेले दिसून येते. या पुस्तकात बहुजन समाजासाठी नवीन मूल्ये स्थापण्याचा प्रयत्न केलेले दिसून येते. स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य, न्याय, समता मिळण्याचा आग्रह मांडलेला आहे. ''सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे ?'' याचे उत्तर देताना जोतीबा म्हणतात,

1) ''आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केले. त्यापैकी स्त्रीपुरूष हे उभयत:

जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, असे कबूल करणारे, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

6) आपल्या सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व स्त्रीपुरूषांस, एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहेत. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवाची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरी करू शकत नाही व त्याप्रमाणे जबरी न करणारांस, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

17) स्त्री अथवा पुरूष, जे व्यभिचार करीत नाहीत अथवा व्यभिचाऱ्यांचा सन्मान ठेवीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

22) स्त्री अथवा पुरूष, जे आपल्या कुटुंबासह, आपल्या भाऊबंदास, आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस आणि आपल्या इष्टमित्र साथ्यांस मोठ्या तोऱ्याने पिढीजादा श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

26) स्त्री अथवा पुरुष, जे शेतकी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरणारांस श्रेष्ठ मानितात, परंतु शेतकरी वगैऱ्यास मदत करणारांचा आदरसत्कार करितात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

27) स्त्री अथवा पुरूष, जे चांभाराच्या घरी का होईना, बिगाऱ्यांचा धंदा करून आपला निर्वाह करणाऱ्यांस तुच्छ मानीत नाहीत, परंतु त्या कामी कदत करणारांची वहावा करितात, त्यांस सत्यवर्तन म्हणावेत. [33]

सार्वजनिक सत्यधर्मपुस्तकात जातीविरोधी, श्रमिकांचा सन्मान करणारी, लोकशाहीपूरक मूल्ये विशिष्ट पद्धतीने स्पष्ट केले आहे. त्यामध्ये स्त्री समानतेसाठी पुरूषांप्रमाणेच स्त्रीचा उल्लेख केलेला आहे. विषमता नष्ट करणाऱ्यावर यात भर दिलेले आहे. अशा पद्धतीने म. फुल्यांनी कुटुंबसंस्थेचे विचार व त्याची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. व त्यात ते यशस्वी झाले तरी आजही कुटुंबसंस्थेच्या रूढी, प्रथा

समाजात आढळतात. कुटुंबातील स्त्री घटकाचे महत्व त्यांनी ओळखले आणि म्हणूनच त्यांनी असे म्हटले आहे की, ''जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाचे उद्धारी ''

**पितृसत्ताकतेसंदर्भातील विचार :**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये पितृसत्ताक पद्धत मोठ्या प्रमाणात असलेली दिसून येते. बहुजन समाजापेक्षा ब्राह्मण व उच्चवर्गीयांमध्ये जास्त प्रमाणात आहेत. वेदकाळात असलेले स्त्री स्वातंत्र्य, मातृसत्ताक पद्धती नष्ट होत गेली् मात्र पितृसत्ताक पद्धती आजतागायत आपले स्थान टिकवून आहे.पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्री अधिकारांचा व स्वतंत्र्याचा संकोच झालेला दिसून येतो. जोतीबांच्या नजरेस पितृसत्ताकतेचे दोष जाणून आले. स्त्रियांचे केशवपन, बालविवाह, विधवा पुनर्विवाहास बंदी, स्त्री शिक्षणास बंदी, धार्मिक कार्यात बंदी मुक्तपणे बोलण्यास वावरण्यास बंदी अशी बंधने पितृसत्ताक कुटुंबपद्धतीची होती.

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत नवऱ्याने कितीही लग्ने केली तरी चालतात. मात्र स्त्रीने एकदाच लग्न करावं. स्त्रीने सती गेले पाहिजे. पतीने आपल्या पतीसाठी सर्वस्व अर्पावे, व्यसनी नवरा असला तरी त्याची सेवा करावी असे नियम स्त्रीयांसाठी बनले.

या सर्वगोष्टी लक्षात घेऊन म. फुलेंनी 'सार्वजनिक सत्य धर्म' या पुस्तकात 'स्त्री आणि पुरूष' या भागात उत्तरे देताना पितृसत्ताकतेवर घणघणती टिकाच केलेली दिसते ती अशी. स्त्री पुरूषांमध्ये स्त्री श्रेष्ठ आहे. घरातील बहिण भावंडाचे पाठराखेपणा करीते. स्त्री पुरूषावर जास्त प्रेम करते याचे प्रमाण ती सती जाऊन देते. वैधव्यात मरेपर्यंतचा काळ काढते. मात्र पुरुष असे करीत नाहीत. आतापर्यंत पत्नीच्या दु:खाने कोणी पुरूष 'सता' गेलेला कोणी ऐकिले आहे काय ? असा सवाल ते करतात. पुरूष हवी तेवढी

लग्ने करतो. स्त्रियांची स्थिती तशी नाही. स्त्रिया कधी अनेक गृहस्थांबरोबर लग्न करून 'सवता' करून नांदत नाहीत. स्त्री अबला आहे असे म्हणून पुरूषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरूषांनी आपलेच घोडे पुढे दामटून, स्त्रियांना मानवी हक्कापासून वंचित केले. स्त्री जातीस नीच मानले आहे. पुरूषी लोभामुळेच जगात प्रथम हेवा, द्वेष, कृत्रिम वगैरे नाना प्रकारचे दुर्गुणाने सर्व पातके निर्माण झाली. [34] अशा पद्धतीचे पुरुषप्रधान समाजातील घटनेंची वर्णने फुल्यांनी केली आहेत.

स्त्री मुक्तीच्या क्रांती अग्रणी असलेल्या ताराबाई शिंदे यांनी अत्यंत धारधार शब्दात पुराणकथांच्या स्त्री विरोधी भूमिकांचा समाचार घेतला. धर्मकथांमधील आदर्श स्त्री विरोधी कसे आहेत हे दाखवून दिले. स्त्री-पुरूष धर्मातील विसंगती त्यांनी पुढे आणली. त्यांनी राष्ट्रवादी स्वयंघोषित समाजसुधारक, धर्मग्रंथ, कुटुंबपद्धती यामधील पुरूषवर्चस्ववादावर समग्र टिका केली आहे.[35] स्त्रीचे दास्यत्व नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या, त्यांचे कल्याण व सुधारणा करणाऱ्या पंढीता रमाबाईही होत्या.

सत्सार-2 मध्ये फुल्यांनी पं. रमाबाई व ताराबाई शिंदेंचे समर्थन त्यांनी केलेले आहे. ताराबाईंच्या पुरूषप्रधान समाजाविषयीची कठोर भूमिका फुल्यांनी मांडलेल्या विचारातून जिवंत राहीलेल्या दिसतात.

फुल्यांनी प्रथम ब्राह्मणांकडून शूद्र, अतिशूद्रांवर होणाऱ्या अन्यायाबरोबरच स्त्री शोषणारी दखल घेतली होती. त्यांनी मुलींच्या शिक्षणाचा आग्रह धरलाच होता. विधवांना आश्रय व अनाथमुलांचे संगोपन याचा प्रयत्न ही केला होता. पण नंतर मात्र त्यांनी खऱ्या अर्थाने स्त्री पुरूष संबंधात स्त्री अन्यायाची बाजू मांडण्यास सुरूवात केल्याचे त्यांच्या लिखाणातून दिसून आले.

"---------स्त्रियांपेक्षा पुरूषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन जास्ती

भयंकर, धाडसी दुष्टकर्मे आचरणारे आहेत, प्रथम मूळ लग्नाची पहिली स्त्री दादलोजीस आवडेनाशी झाली, म्हणजे त्याने दुसरी स्त्री, तिच्या उरावर तिसरी मग चौथी स्त्री असे करून अखेरीस तिचा चोंबडा चाकर बनून रात्रंदिवस तिचे भोवताली गोंडा घोळून मौजा मारितो, परंतु स्त्रीचे लग्न होताच तिचा नवरा दुर्वर्तनी निपजल्यास देखील तिने याचे उरावर दुसरा नवरा करून त्याच घरात रात्रंदिवस संसार प्रपंच करून राहावे, म्हणून आर्य पुरूषांनी केलेल्या ग्रंथात कुठे लेख सापडत नाही. पण एरवीची गोष्ट कशाला ? यावरून स्त्रिया किंवा पुरूषच याचपैकी कोण ज्यास्ती पक्षपाती, ज्यास्त दगेबाज व ज्यास्ती कृत्रिमी आहे ? अरे बाळा, या पक्षपाती, आर्य ग्रंथकरांचे घ्यावयाचे माप एक व द्यावयाचे माप एक ''[36] अशा प्रकारे पुरूषी गुणाचे आणखी एक दर्शन त्यांच्या लिखाणातून जाणवते.

स्त्रिया पुरुषांची अरेरावी सहन करून मुलांचे लालनपालन कसे करतात हे ही त्यांनी लिहीलेले आहे. '''------तीच आपल्या सर्वांस जन्म देणारी, होय. आपले मलमूत्रादि काढून आपल्या सर्वांचे लालन व पालन करून आपल्या सर्वांचा परामर्श करणारी होय. आपण सर्व पंगू लाचार असता सर्वकाळ आपली काळजी वाहते व तिनेंच आपणा सर्वांस चालावयास व बोलावयास शिकविले, यावरून एकंदर आबालवृद्धात जगप्रसिद्ध म्हण पडली आहे की, ''सर्वांचे उपकार फिटतील परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाहीत. ''यास्तव नि:संशय पुरूषांपेक्षा स्त्री माझ्या मते श्रेष्ठ आहे.[37] अशा पद्धतीने स्त्रीचे महत्व त्यांनी मांडले आहे.

'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात प्रश्नांना उत्तरे देताना एकंदर पुरूषांचे स्त्रियांवरचे वर्चस्व व्यक्त होते. काही पुरूषाच्या ठिकाणी जास्ती स्त्रियांचा लोभ का झाला ? त्यांनी आपला बचाव कसा करून घेतला नाही ? या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात, ''लोभाने ज्यांचे चित्त आकृष्ट झाले आहे अशा मनुष्यांनी ईश्वराने दिलेल्या सद्सद्विचाररूपी गुणांचा अव्हेर केल्यामुळे ते पुरूष पापी झाले.''

स्त्रियांनी षाणेरडे वर्तन केल्यास त्यांना अघोर प्रायश्चित दिले पाहीजे. यास उत्तर देताना ते हणतात, ''तुम्हाला स्त्रीचे असे आचरण आवडणार नाही तर स्त्रीस तरी पुरूषांचे आचरण कसे आवडेल ? असा उलट सवाल करून ते म्हणतात स्त्री पुरूष सारखेच मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असताना स्त्री पुरूषांसाठी वेगळे वेगळे नियम लागू करणे हा पक्षपातच आहे. [38]

महात्मा फुल्यांनी स्त्रीच्या समतोलवादी विचाराचे विवेचन पुढील पद्धतीने करतात. स्त्री कोणतीही तक्रार न करता नऊ महीने दिवसरात्र गर्भ आपल्या उदरात सांभाळते. ती आपल्या सर्वांची जन्मदात्री आहे. ती आपले सर्वप्रकारे लालन पालन करते. आपण सर्व ऋणातून मुक्त होऊ. पण जन्मदात्रीच्या या ऋणातून कधी मुक्त होणार नाही. यासाठीच स्त्री नि:संदेहपणे पुरूषांपेक्षा श्रेष्ठ आहे. परंतु आपल्या मातेस तिच्या कष्टास विसरून, कृतघ्न बनतो. यावरूनच हे स्पष्ट होते की पुरूषांनी लिहीलेल्या सर्वग्रंथामध्ये स्त्रियांबरोबर उघडपणे पक्षपात केलेला आहे. जर कोण्या विदुषीने आतापर्यंत कोणता धर्म ग्रंथ लिहीली असता, तर त्यामध्ये स्त्रियांच्या अधिकारांचे रक्षण होऊन सुद्धा पुरुषांच्या अधिकारांबाबत पक्षपातीपणा केला गेला नसता. [39]

यावरून त्यांनी पुरूषप्रधान विचारसरणी स्त्रियांपेक्षा कशी कमी आहे याचेच खंडन केले आहे.

सत्सार-2 मध्ये त्यांनी यशवंताच्या प्रश्नास दिलेल्या उत्तरावरून पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री मानहानी कशी होते ? हे सांगितलेले दिसून येते. ते म्हणतात, पुरूष आपल्या लग्नाच्या व द्वितीय संबंधाच्या स्त्रियांस घरी सोडून रात्रभर वेस्यांच्या बरोबरी फिरतात. यावरुन स्त्री किंवा पुरूष यामध्ये दगाबाज कोण हे दिसून येते. तसेच कित्येक पुरुष स्वस्त्रियांसमक्षा वेस्याकसबीण किंवा पात्राचे नाच बैठकीत गाणे चालू असताना प्रतिष्ठीत पुरुष तिला आपल्या जवळ घेतात. पण कधी स्त्रियांपैकी कुणी असे एकत्रित जमून

एखादा देखणा, जवान, धुष्टपुष्ट कसबी गवई यास आपल्या समोर इष्की गाणी गाण्यास लावून पुरूषांप्रमाणे ख्यालतमाशे करतात काय ?[40] यावरुन पुरूषांनी मन मानेल तसे वागावे आणि स्त्रियांनी ते सहन करावे अशीच परिस्थिती दिसून येते.

'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकांत 'सत्य' या भागत जी उत्तरे महात्मा फुल्यांनी दिली आहेत त्यावरुन पितृसत्ताक किंवा पुरूष प्रधान संस्कृती पेक्षा त्यांना अपेक्षित स्त्री पुरूष कसे समान असावेत हे दिसून येते.

महात्मा फुले म्हणतात की, प्रत्येक स्त्रीने एक पुरूषास आपला पती करण्यासाठी व प्रत्येक पुरूषाने एक स्त्री आपली पत्नी बनविण्यासाठी सोडून बाकी इतर स्त्री-पुरूषांबरोबर आपल्या बहिण-भावंडा प्रमाणे आचरण करावे. एकंदर सर्व स्त्रियां किंवा पुरूषांस सर्व मानवी हक्कांविषयी आपले पाहिजेल तसे विचार, आपली पाहिजेल तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु यापासून व्यक्तीचे कोणत्याच तऱ्हेचे नुकसान मात्र होऊ नये. याची खबरदारी ठेवावी. [41]

यावरुन त्यांनी पुरुषप्रधानता बाजूला ठेवून स्त्री पुरूषांना एकसमान मानलेले दिसते.

त्याकाळातील पितृसत्ताक पद्धतीमधील परिस्थिती, त्यांनी अखंडादी काव्यरचनेत 'मानवाचा धर्म एक' यात स्पष्ट केलेले दिसते. जोतीबा फुले लिहीतात,

जप अनुष्ठाने स्त्रिया मुलें होती।। दुजा कां करीती ।। मुलाबाळी ।।1।।
भट ब्राह्मणात बहु स्त्रिया वांज ।। अनुष्ठानी बीज।। नाहीं का रे ।।2।।
अनुष्ठानावीण विध्वा मुले देती ।। मारूनी टाकिती।। सांदीकोनी ।।3।।
ज्याची जशीकर्मे तशी फळा येती।। शिक्षा ती भोगिती जोती म्हणे ।।4।।[42]

यावरून इतर स्त्रियांस मुले होत नाहीत वांज आहेत तर विधवा स्त्रिया या मुलांना जन्म दिल्यानंतर मारुन टाकतात. म्हणजेच पुरूषप्रधान संस्कृतीत विधवेस कोणत्याही परिस्थितीत तोंड लपवून रहावे लागते हेच यावरुन दिसते. काव्यात्मक रूपातही त्यांनी पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला कसे घेरले आहे हेच स्पष्ट केले आहे.

अशा पद्धतीने जोतिबांनी स्त्रीयांच्या गुलामगिरीचे किंवा 'पितृसत्ताकतेचे' स्पष्टीकरण केलेले आहे. त्यांच्या समाजात आपणास दोष किंवा उणिवा वाटतील. उदा. ज्याला आज आपण 'सामाजिक लैंगिक श्रमविभगणी' म्हणतो त्याविषयी त्यांनी काही मांडणी केलेली नाही. किंवा स्त्री गुलामगिरीच्या उदय व इतिहासाचे लिखाण त्रोटक दिसून येतात. अर्थात शेतकऱ्यांची लूट होत जाण्याच्या इतिहासामध्ये स्त्रिया जास्त प्रमाणात लुटीच्या बळी झाल्या आहेत. 'स्त्रिया लुटारू किंवा चोर नसतात', 'लुटणाऱ्यांना व दुसऱ्यांवर गुलामी लादणाऱ्यांना आधार देणारे ग्रंथ पुरूषांनी लिहिले आहेत', 'स्त्रियांनी फसवणूकीचे काम केलेले नाही.' अशा अर्थाची मांडणी मात्र जोतीबांनी ठामपणे केली आहे.

म्हणजे शेवटी सामाजिक कारणामुळे स्त्रियांची गुलामगिरी होती असा निष्कर्ष जोतीबांनी काढला आहे.

थोडक्यात, जोतीबांनी घेतलेली भूमिका केवळ स्त्री उद्धार किंवा सुशिक्षित होण्याच्या दृष्टीकोनातून नसून स्त्रियांवर पुरूषांकडून लादली गेलेली गुलामगिरी नष्ट होणे गरजेचे आहे अशी होती. आणि म्हणूनच त्यांनी पितृसत्ताक कुटुंबपद्धतीवर आधारीत समाजावर घणाघाती हल्ला केलेला आहे. त्या काळात स्त्री बाबतच्या प्रश्नांची फुलेंची भूमिका महत्त्वपूर्ण होती. त्यांचा विचार हा स्त्री चळवळीला पोषक होता. जाती धर्मावरच नव्हे तर संपूर्ण समाजात स्त्रीच्या होणाऱ्या शोषणाची मांडणी केली. व हे टाळण्यासाठी कुटुंब पद्धतीची पुनर्रचना करण्याचा कार्यक्रम सूचवून हा प्रश्न सोडविण्यासाठी

पितृसत्ताकतेच्या हुकुमशाहीवरच हल्ला चढविलेला दिसून येते.

## : संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| 1. | प्रा. अंकुश रा. सावंत : | मनुस्मृती एक समालोचन<br>केशव भिकाजी ढवळे मुंबई<br>प्रथमावृत्ती 1986 पान नं. 56 |
| 2. | प्र. संपादक तर्कतीर्थ : लक्ष्मणशास्त्री जोशी : | मराठी विश्वकोश खंड 4<br>महाराष्ट्र राष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1976 पृ. क्र. 79 |
| 3. | कित्ता | पान नं. 70 |
| 4. | कित्ता | पान नं. 70 |
| 5. | कित्ता | पान नं. 70 |
| 6. | कित्ता | पान नं. 71 |
| 7. | कित्ता | पान नं. 71 |
| 8. | कित्ता | पान नं. 71 |
| 9. | प्र. संपादक तर्कतीर्थ : लक्ष्मणशास्त्री जोशी : | मराठी विश्वकोश खंड 13<br>महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई 1987<br>पान नं. 184 |
| 10. | कित्ता | पान नं. 184 |
| 11. | कित्ता | पान नं. 184 |
| 12. | तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी : | वैदिक संस्कृतीचा इतिहास प्राज्ञपाठ शाळामंडळ, वाई 1972, पान नं. 232-233 |
| 13. | प्र. संपादक तर्क. लक्ष्मणशास्त्री जोशी : | मराठी विश्वकोश, खंड 13 उपरोक्त |
| 14. | प्र. संपादक तर्क. लक्ष्मणशास्त्री जोशी : | उपरोक्त पान नं. 236 |

15. इतिहासाचार्य राजवाडे : भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास लोकवाङमय गृह लि. मुंबई
तिसरी आवृत्ती 15 ऑ. 1989
पान नं. 51 ते 57

16. प्र. संपादक तकतीर्थ : लक्ष्मणशास्त्री जोशी : मराठी विश्वकोश खंड-9
महाराष्ट्र राष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई 1980
पान नं. 693-94

17. कित्ता पान नं. 694

18. प्र. संपादक तकतीर्थ : लक्ष्मणशास्त्री जोशी : मराठी विश्वकोश खंड 12
महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई 1985
पान नं. 1523

19. प्रा. (डॉ.) अंकुश रा. सावंत : उपरोक्त
पान नं. 58-71

20. प्रभाकर वैद्य : महात्मा फुले आणि त्यांची परंपरा लोकवाङमय गृह, मुंबई 1974 पान नं. 171

21. भास्कर लक्ष्मण भोळे : जोतीरावांची समता संकल्पना
लोकवाङमयगृह, मुंबई
प्रथम प्रवृत्ती 1990 पान नं. 23

22. संपादक य. दि. फडके : महात्मा फुले समग्र वाङमय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई चौथी आवृती, 1991 पान नं. 448-49

23. कित्ता पान नं. 539

24. कित्ता पान नं. 564

25. भास्कर लक्ष्मण भोळे : उपरोक्त पान नं. 24

26. संपादक य. दि. फडके : उपरोक्त पान नं. 355

27. कित्ता पान नं. 422

28. डॉ. गेल ऑम्व्हेट : जोतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार लोकवाङमय गृह, मुंबई प्रथमावृत्ती नोव्हे. 1990 पान नं. 30

29. कित्ता पान नं. 31

30. कित्ता पान नं. 32

31. संपादक धनंजय किर, स. गं. मालशे : महात्मा फुले समग्र वाङमय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, 1969 पान नं. 332-333

32. डॉ. गेल ऑम्व्हेट : उपरोक्त पान नं. 33

33. संपादक धनंजय किर, स. गं. मालशे : उपरोक्त पान नं. 411-414

34. कित्ता पान नं. 358 ते 360

35. डॉ. गेल ऑम्व्हेट : उपरोक्त पान नं. 22 व 23

36. संपादक धनंजय किर, स. गं. मालशे : उपरोक्त पान नं. 299

37. कित्ता पान नं. 359

38. कित्ता पान नं. 362

39. संपादक हरिनरके : महात्मा फुले : साहित्य और विचार महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई प्रथम संस्करण - 1993 पृ. क्र. 27

40. संपादक धनंजय किर, स. गं. मालशे : उपरोक्त पान नं. 299ते 300

41. कित्ता पान नं. 411-412

42. डॉ. गेल ऑम्व्हेट : उपरोक्त पान नं. 28


****